# ‘मनोहर सपाटेंना ‘एमपीडीए’लावा, छत्रपती शिवाजी प्रशालेसह समाजाची बदनामी थांबवा’

**: डॉ. फडकुले सभागृहात मराठ्यांचा एल्गार**
**: बडतर्फ राष्ट्रवादीच्या नेत्याचे ‘कारनाम्यां’चे पोस्टमार्टम**

✔ सोलापूर/प्रतिनिधी

सोलापूरचे माजी महापौर आणि राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे बडतर्फ नेते मनोहर सपाटे यांच्यावर साधारण २६ पेक्षा अधिक विविध प्रकरणांचे गुन्हे दाखल आहेत, त्यामुळे त्यांच्यावर ‘एमपीडीए’ कायद्यांतर्गत कारवाई करुन त्यांना येरवडा कारागृहात सोडण्यात यावं, असा एल्गार मराठ्यांनी काल केला. सपाटे यांच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी प्रशालेसह मराठा समाजाची बदनामी थांबवावी, अशी एकमुखी मागणीदेखील यावेळी करण्यात आली.

विशेषत्वे, विकृतीचे दर्शन घडवून समाजमन अस्वस्थ करणाऱ्यासह अनेक अभागी महिलांना त्रास देत त्यांचे आयुष्य उद्ध्वस्त करण्याच्या प्रकरणात सपाटे यांच्यावर कठोर कारवाई व्हावी, यासाठी पोलिस आयुक्त यांच्याकडे समाजाच्यावतीने पाठपुरावा करण्याचा निर्णयदेखील यावेळी मराठ्यांनी केला.

सपाटे यांच्यावर विनयभंगाचा गुन्हा दाखल झाला आहे. शिवाय पिडितेसोबतचे व्हिडीओ सोशल मीडियावर वाऱ्याप्रमाणे व्हायरल होत आहेत. पिडितेस न्याय मिळवून देणाऱ्या ॲड. योगेश पवार यांना जीवे मारण्याची धमकी सपाटे यांनी दिली आहे. एकूणच सपाटे यांच्या या कारनाम्यांमुळे छत्रपती शिवाजी शाळेसह समाजाची बदनामी होत आहे, यावर विचारमंथन आणि ठोस धोरण हाती घेण्यासाठी मंगळवार (ता.२) सोलापुरातील डॉ.फडकुले सभागृहात मराठा समाजाच्या नेत्यांसह छत्रपती शिवाजी प्रशालेशी संबंधित असणाऱ्यांची विशेष बैठक बोलावण्यात आली होती.

दरम्यान यावेळी उपस्थित सर्वांनीच सपाटे यांच्या आजरच्या कारनाम्याचे पोस्टमार्टम करीत त्यांच्य वादग्रस्त आणि विकृत वृत्तींमुळे छत्रपती शिवाजी प्रशालेसह समाजाची बदनामी होत असल्याचे सांगितले. यावेळी दिलीप कोल्हे, अमोल शिंदे, सुनील रसाळे, प्रताप चव्हाण आदी नेतेमंडळींसह अनेक मान्यवर उपस्थित होते.



सोलापूर : येथील डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहात आयोजित मराठा समाजाच्या बैठकवेळी दिलीप कोल्हे, अमोल शिंदे, सुनील रसाळे, प्रताप चव्हाण आदी.

### अवघ्या ३ गुन्ह्यात काहींना ‘एमपीडीए’ होते, २६ गुन्हे असून सपाटेंना ‘एमपीडीए’ का लागत नाही?

मागच्या काही दिवसांपासून ३ पेक्षा अधिक गुन्हे दाखल झाल्यास पोलिस आयुक्त कार्यालयाकडून संबंधितजणांवर एमपीडीएची कारवाई होत आहे. यातून अनेकजण येरवडा तुरुंगात गेले. मात्र सपाटे यांच्यावर २६ गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत, असे असतानात यांना एमपीडीए का लागत नाही, असा सवाल उपस्थित दिलीप कोल्हेसह उपस्थित काही नेतेमंडळींनी केला.

### सपाटेंना छत्रपती शिवाजी शाळेच्या कारभारातून हटवा

विकृत आणि मनोरुग्ण असलेल्या मनोहर सपाटे यांच्यामुळे छत्रपती शिवाजी प्रशालेची नाहक बदनामी होत आहे. शिवाय त्यांच्या विकृत वागण्याने राजे छत्रपतींचे नाव असलेल्या संस्थेची प्रतिमा डागाळत आहे, तेव्हा या संस्थेवरुन सपाटेंना कायमचे हटविण्याची मागणीदेखील यावेळी करण्यात आली.

## सपाटेंच्या घटनेचा निषेधच, काही खोडसाळांकडून मला अडचणीत आणण्याचे षडयंत्र : कदम



सोलापूर : मनोहर सपाटे यांच्या हातून जी घटना घडली, त्याचे मी असो वा कुणीही समर्थन करीत नाही, त्या घटनेचा निषेधच आहे. तथापि, काही खोडसाळ आणि समाजकंटक यांच्याकडून सपाटे यांच्यासोबतचे माझे जुने फोटो फेसबुकसह सोशल मीडियाच्या अन्य साईटस्‌वरुन टाकून मला अडचणीत आणण्याचे षडयंत्र सुरु असल्याचे राष्ट्रवादी युवक काँग्रेस सोलापूर शहर-जिल्हा अध्यक्ष सुहास कदम यांनी सांगितले. राजकीय जीवनात काम करत असताना फार संकटांना तोंड देत उभं राहावं लागतं, आजपर्यंत कोणताही डाग न लावता राजकीय आणि सामाजिक काम करत आलो आहे, असे कदम यांनी सांगतानच, सपाटे यांच्या समर्थनार्थ आपण उभे ठाकलो आहोत, असे चित्र निर्माण करण्याचा घाट घातला जात आहे. त्यांच्यासोबतचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल करुन समाजात माझ्याबद्दल द्वेष पसरविण्याचे षडयंत्र सुरु आहे, असेही स्पष्टीकरण कदम यांनी दिले आहे. काही समाजकंटांकडून माझ्याबद्दल जे षडयंत्र सुरु आहे, त्यातून माझ्या राजकीय आणि सामाजिक नावाला बाधा निर्माण होत आहे, असेही शेवटी त्यांनी सांगितले.

## समाजात संभ्रम निर्माण करण्याचा खोडसाळ प्रयत्न; षडयंत्राने मराठा समाजात प्रतिमा डागाळणार नाही : पवार



मनोहर सपाटे यांच्यासोबतचे माझे काही जुने फोटो वापरुन त्याद्वारे समाजात संभ्रम निर्माण करण्याचा काही समाजकटंककांकडून खोडसाळपणे प्रयत्न सुरु असल्याचे सकल मराठा समाजाचे समन्वयक माऊली पवार यांनी सांगितले. आजपर्यंत कोणत्याही राजकीय भूमिकेत न राहता केवळ मराठा समाजाच्या हक्कांसाठी समन्वयाचे काम पार पाडले आहे आणि पुढेही करत राहणार आहे. मात्र समाजामधील काही मंडळींनाच माझं हे काम बघवत नसावं, त्यामुळे सपाटेंच्या बाजूने मी उभा आहे, हे दाखववण्यासाठी, मराठा समाजात माझ्याबद्दल संभ्रम निर्माण करण्यासाठी सपाटे यांच्यासोबतच्या जुन्या फोटोंचा संदर्भ लावून असे फोटो सोशल मीडियावरुन व्हायल करण्याचे षडयंत्र सुरु आहे. मात्र जे कोणी हा प्रकार करीत आहेत, त्याला मराठा समाजामधून समर्थन मिळणार नाही. सत्याच्या बाजूची मी आजवर बुज राखत आला आहे, त्यामुळे समाजात माझी प्रतिमा डाळगणार नाही, उलट जे कोणी असे षडयंत्र करीत आहेत, त्यांना समाज ओखळून आहे, असेही पवार यांनी सांगितले. सामाजिक समन्वयाचा अपमान करणाऱ्या असत्य माहितीची चोख उकल व्हायलाच हवी, असेही शेवटी ते म्हणाले.

## व्हिडीओ व्हायरलच्या गुन्ह्यात ॲड. योगेश पवार यांस अंतरिम अटकपूर्व जामीन मंजूर

सोलापूर : माजी महापौर मनोहर सपाटे यांचेवर दाखल झालेल्या विनयभंगाच्या गुन्ह्यातील व्हिडीओ फेसबुकवर व्हायरल केल्यामुळे ॲड. योगेश पवार यांच्यावर फौजदार चावडी पोलीस स्टेशनचे पोलिस अधिकारी अजित पाटील यांनी गुन्हा रजिस्टर नंबर ४६४ अन्वये आयटी कलम ६७ (अ) प्रमाणे गुन्हा दाखल केला होता. त्या गुन्ह्यात अटक होईल, म्हणून योगेश पवार यांनी ॲड. डी. एन. भडंगे यांच्यामार्फत अटकपूर्व जामीन अर्ज दाखल केला होता.

दरम्यान जामीन अर्जाची सुनावणी आज रोजी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश मनोज शर्मा साहेबांकडे झाली. या सुनावणीवेळी सरकार पक्षाने जामीन अर्जास सक्त विरोध केला. आरोपी योगेश पवार यांच्या वकिलांनी केलेला युक्तिवाद ग्राह्य धरून, तपास अधिकाऱ्यांना नोटीस काढून दिनांक ८ जुलै २०२५ पर्यंत १५००० रुपयांच्या पीआर बॉण्डवर आणि तपास अधिकारी बोलवतील तेव्हा हजर होऊन तपास कामात मदत करण्याच्या अटीवर प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश मनोज शर्मा साहेबांनी योगेश पवार यांस अंतरिम अटकपूर्व जामीन मंजूर केला. यात आरोपी योगेश पवारतर्फे ॲड. डी. एन. भडंगे व ॲड. एन. एन. भडंगे यांनी काम पाहिले.



पुरंदावडे (ता. माळशिरस) येथे संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माउलींचे पहिले गोल रिंगण उत्साहात पार पडले. छायाचित्र - रविराज वाणी, माळशिरस

## आगाऊ आरक्षणार्थींना मिळणार १५ टक्के सवलत; एसटी महामंडळातर्फे प्रवाशांना मिळणार दिलासा

- मंगळवारपासून सुरु झाली सवलत
- दिवाळी आणि उन्हाळी सुट्टीच्या गर्दीत मिळणार नाही सूट

✔ सोलापूर/प्रतिनिधी

एसटीच्या लांब व मध्यम पल्ल्याच्या (१५० कि.मी. पेक्षा जास्त) प्रवासासाठी आगाऊ आरक्षण काढणाऱ्या पूर्ण तिकिट काढलेल्या प्रवाशांना तिकिट दरात १५ टक्के सवलत दिली जाणार आहे. ही योजना दिवाळी व उन्हाळी सुट्टींचा गर्दीचा हंगाम वगळता वर्षभर सुरु राहणार आहे. या योजनेची सुरुवात (१ जुलै) पासून करण्यात येत आहे. तरी प्रवाशांनी याचा लाभ घ्यावा असे, आवाहन परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केले आहे.



(दि.१ जून) रोजी एसटीच्या ७७ व्या वर्धापन दिनी परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी कमी गर्दीच्या हंगामामध्ये लांब पल्ल्याच्या बसमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांनी आगाऊ आरक्षण केल्यास त्यांच्या तिकिटामध्ये १५ टक्के सूट देण्यात येईल. अशी घोषणा केली होती. त्यानुसार ही योजना सर्व प्रकारच्या बससाठी (दि.१जुलै) पासून लागू करण्यात येत आहे. ही योजना पूर्ण तिकिट काढणाऱ्या प्रवाशांसाठीच लागू राहणार आहे.

### आषाढी एकादशी अन् गणपती उत्सवात प्रवाशांना लाभ

आषाढी एकादशीला व गणपती उत्सवासाठी आगाऊ आरक्षण काढणाऱ्या प्रवाशांना या योजनेचा लाभ घेता येऊ शकणार आहे. राज्यभरातून पंढरपूर येथे जाणाऱ्या नियमित बसेसचे आरक्षण प्र

## मराठी संतावर पहिला पाश्चात्य चित्रपट वर्षाखेरीस येणार

✔ **पंढरपूर** : युरोपमधील चित्रपट स्टुडिओने संत सावता माळी यांच्यावरील पहिला पाश्चात्य चित्रपट महाराष्ट्रात चित्रीत केला. आत्मारामा स्टुडिओ निर्मित हा प्रकल्प गोविंददास (इगोर मिहाज्लोविक, क्रोएशिया) आणि अचला (सिल्विया मिहाज्लोविक, पोलंड) या जोडप्याने त्यांच्या सद्‌गुरु परमहंस विश्वानंद यांच्या प्रेरणेने मराठी संतांच्या कथा साकारण्यासाठी केला आहे. विठ्ठलाची आस, हा चित्रपट पहिल्यांदाच चित्रपटात काम करणाऱ्या स्थानिक कलाकारांसोबत शूट करण्यात आला आहे. हा महाराष्ट्रातील संत परंपरेवरील अनेक नियोजित चित्रपटांपैकी पहिला चित्रपट आहे. या चित्रपटात संत सावता माळी यांच्या वंशजांनी काम केले आहे. वर्षा अखेरीस प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. हा चित्रपट सावता माळी यांनी काम केलेल्या शेतामध्ये चित्रीत करण्यात आला आहे. यात अरण, रोपळे, बोराळे या गावातील नवोदीत कलाकारांनी अभिनय केला आहे. तर संत सावता माळी यांच्या १७ व्या व १८ व्या पिढीतील वंशज देखील प्रमुख भूमिकेत दिसणार आहेत. या चित्रपटाचे वारकरी, भाविकांना उत्सुकता लागली आहे.


## तरूण वारकरी नीरा नदीत बुडला, मृतदेह अद्याप सापडला नाही

### मुलाचा मृतदेह शोधून काढा अन्यथा आम्हीही नीरा नदीत उड्या मारू, वारकऱ्यांचा प्रशासनाला इशारा

✔ सोलापूर/प्रतिनिधी

जिल्ह्यात नीरा नदीत पादुका स्नान होण्यापूर्वी जालना जिल्ह्यातील एक वारकरी तरुण बुडाला. त्याचा शोध घेण्यासाठी वारकऱ्यांनी आंदोलन सुरू केले आहे.

पुणे जिल्ह्यातून सोलापूर जिल्ह्यात प्रवेश केल्यानंतर संत तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळ्यातील भाविकांचे नीरा स्नान पार पडते. याच नीरा स्नानापूर्वी एक तरुण नीरा नदीत बुडून मरण पावल्याची घटना घडली आहे.



### तरुणाच्या मृतदेहाचा शोध घेण्यासाठी आंदोलन

नदीत बुडालेल्या गोंविदचा शोध घेण्यात यावा, अशी मागणी वारकऱ्यांनी प्रशासनाकडे केली. वारकऱ्यांनी सराटीच्या पुलावर रास्ता रोको आंदोलन सुरू करण्यात आले. मुलाचा मृतदेह शोधून काढा अन्यथा आम्हीही नीरा नदीत उडी मारू, असा पवित्रा घेत वारकऱ्यांनी प्रशासनाला इशारा दिला

त्याचा मृतदेह शोधण्यात यावा, या मागणीसाठी वारकऱ्यांनी रास्ता रोको आंदोलन सुरू केले आहे.

पुणे जिल्ह्यातील सराटी येथून सोलापूर जिल्ह्यात संत तुकाराम महाराज पालखी प्रवेश करताना नीरा नदीत पादुका स्नान करण्यआधी दुर्घटना झाली.

जालना येथील युवक गोविंद नामदेव फोके हा नीरा नदीच्या पाण्यात बुडून मरण पावला आहे. ही घटना पहाटे सहा वाजता घडली. हा युवक रथामागील दिंडी क्रमांक बारामध्ये सामील होता.

देवराव बुवा हातगावकर असे दिंडीचे नाव असून जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यात असलेल्या झिरपी गावचे हे ग्रामस्थ आहेत. प्रयागबाई प्रभाकर खराबे हे या आजीसोबत गोविंद युवक वारीला आला होता. तो बारावीमध्ये शिकत होता.